


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१८८ ■ शुक्रवार १८ एप्रिल २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26

**आकर्षक लग्न पत्रिका**

उत्तम क्वॉलिटी व उत्कृष्ट दर्जेची लग्न पत्रिका प्रिंटींग सह तसेच गिफ्ट पाकीट व फॅन्सी कार्ड शिट होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण

**श्रीहरि पेपर प्रॉडक्टस्**

"कार्ड हाऊस", गल्ली नं.५, धुळे

मो.94239 28900

## वक्फ कायद्यातील दोन कलमांच्या अंमलबजावणीस स्थगिती सर्वोच्च न्यायालयाचे तात्पुरते आदेश; याचिकेवर सुनावणी

**नवी दिल्ली, दि.१७- केंद्र सरकारने नुकत्याच संपलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटी लोकसभा व राज्यसभेत वक्फ विधेयक मंजूर करून घेतले. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर त्याचे कायद्यात रुपांतर झाले. पण या विधेयकाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्यानंतर त्यावर सविस्तर सुनावणी सुरू झाली. या सुनावणीदरम्यान आज सर्वोच्च न्यायालयाने वक्फ कायद्यातील दोन कलमांच्या अंमलबजावणीवर केंद्र सरकारच्या विनंतीनुसार तात्पुरती स्थगिती आणण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.**



आज सर्वोच्च न्यायालयात केंद्र सरकारने न्यायालयाला दोन मुद्द्यांवर आश्वासन दिले आहे. त्यानुसार पुढील सुनावणी होईपर्यंत नव्या कायद्यानुसार बाहेरील सदस्यांची वक्फ बोर्डावर नियुक्ती केली जाणार नाही. त्याशिवाय, वक्फ बोर्डाने एखादी मालमत्ता वक्फ बोर्डाची असल्याचे जाहीर केले असेल, तर त्यात पुढील सुनावणीपर्यंत हस्तक्षेप करणार नाही. या भूमिकेवर सर्वोच्च न्यायालयाने मंजुरी दिली असून येत्या ७ दिवसांत केंद्र सरकारला या मुद्द्यांवर भूमिका सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्यायमूर्ती संजय कुमार व न्यायमूर्ती के.व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. या सुनावणीत कायद्याच्या विरोधात याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील राजीव धवन, कपिल सिब्बल, अभिषेक मनू सिंघवी, सी.यू. सिंह, राजीव शाकधर, संजय हेगडे, हझेफा अहमदी व शादान फरासत या वकिलांनी बाजू मांडली. तर केंद्र सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता, ज्येष्ठ वकील राकेश द्विवेदी व रणजित कुमार यांनी बाजू मांडली.

**फक्त पाच याचिकांवरच सुनावणी**

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयात वक्फ कायद्यावर आक्षेप घेणाऱ्या जवळपास १५० हून अधिक याचिका दाखल झाल्या आहेत. याचा **(पान ४ वर)**

## राज्य मंत्रिमंडळाची चौंडीला बैठक

अहिल्यानगर, दि.१७- राज्याच्या मंत्रिमंडळाची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मस्थान असलेल्या चौंडी (ता. जामखेड) येथे बैठक होणार आहे. ही बैठक दि.२९ एप्रिलला होण्याची शक्यता आहे. अहिल्यादेवींच्या जयंतीचे त्रिशताब्दी महोत्सवी वर्षाचे औचित्य साधत ही बैठक होणार असल्याची माहिती मिळाली. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठका साधारणपणे मुंबईत होतात. नागपूर व छत्रपती संभाजीनगर येथेही प्रसंगानिमित्त बैठका आयोजित केल्या गेल्या आहेत. मात्र, ग्रामीण भागात होणारी ही पहिलीच बैठक असणार आहे. बैठक होण्यासाठी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे आग्रही होते. बैठक होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक विभागीय आयुक्त **(पान ४ वर)**

## एमसीए अध्यक्ष आ.रोहित पवारांची धुळे, शिरपूरला भेट जिल्हा क्रिकेट असो.ला शहाण्णव लाखांचा निधी मंजूर



**शिरपूर, दि.१७- महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आमदार रोहित पवार यांनी शिरपूर व धुळे येथे भेट देऊन विविध मैदानाची व सोयी सुविधाची पाहणी करुन धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष भूपेशभाई पटेल, मुख्य सल्लागार माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांच्या पाठपुरावा नुसार जिल्हा क्रिकेट मैदानासह विविध कामांसाठी १६ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे.**

धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावरील पॅवेलियन, विकेट, ग्राउंड मेंटेनन्स, नवीन विकेट्स, सर्व मुलांसाठी कायम स्वरुपी लेदर बॉल प्रॅक्टिस साठी नवीन पीचेस अशा विविध कामे व उपाय योजनांसाठी ९६ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष भूपेशभाई पटेल, मुख्य सल्लागार माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांच्या पाठपुरावानुसार सर्व वयोगटातील क्रिकेट सामने तसेच रणजी सामने देखील शिरपूर व धुळे येथील क्रिकेट मैदानावर खेळविण्यात येणार असल्याच्या मागणीला देखील यावेळी यश आले आहे. सावळदे ता.शिरपूर येथील एस.व्ही.के.एम., तांडे येथील मुकेश पटेल सीबीएसई स्कूलचे मैदान, कुंडाणे ता. धुळे येथील क्रिकेट **(पान ४ वर)**



## पेट्रोल, डिझेल दरवाढीविरोधात रा.काँ.चे नवापुरात एल्गार आंदोलन

**नवापूर, दि.१७ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरद चंद्र पवार गट) तर्फे पेट्रोल-डिझेल दरवाढीविरोधात एल्गार आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे आयोजन प्रदेशाध्यक्ष मेहबूब भाई शेख यांच्या आदेशाने करण्यात आले.**

जिल्हा युवक अध्यक्ष डॉ.तुषार सननासे व महाराष्ट्र प्रदेश सचिव गोलु राजपूत यांच्या नेतृत्वाखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात आंदोलनास सुरुवात झाली. प्रारंभी कार्यकर्त्यांनी पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर केंद्र सरकारच्या निषेधार्थ जोरदार घोषणा देत आंदोलकांनी पोस्टरद्वारे आपला रोष व्यक्त केला. या आंदोलनात महाराष्ट्र प्रदेश सचिव गोलू राजपूत, तालुका युवक अध्यक्ष नयेन वसावे, तालुका बूथ प्रमुख राजेंद्र वसावे, जिल्हा उपाध्यक्ष आशिष गावीत, जितेंद्र वसावे, यश वसावे, युसुफ खाटीक, प्रेम यादव, अल्ताफभाई मिर्झा, दिलीप गावीत, प्रदीप मावची आदी कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिस निरीक्षक शिवाजी बुधवंत यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विशाल सोनवणे यांनी योग्य बंदोबस्त ठेवला.

## कोर्टाच्या आदेशानंतर सोनगीरला मंदिराचे अतिक्रमण बंदोबस्तात काढले

**सोनगीर दि.१७ (प्रतिनिधी) - उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर येथील कासार गल्लीतील श्रीकृष्ण प्रणामी मंदिराचे अतिक्रमण ग्रामपंचायतीने दुसऱ्या टप्प्यात काढण्यास सुरुवात केली आहे. ही कारवाई आज १७ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता मोठ्या पोलीस बंदोबस्तात सुरू झाली. यापूर्वी ११ मार्च रोजी पहिल्या टप्प्यात कारवाई झाली होती, परंतु ती अपूर्ण राहिली होती. शासकीय सुट्ट्यांमुळे मधल्या काळात कारवाई थांबवण्यात आली होती.**



मंदिराच्या समोरील ध्वजस्तंभ, पायऱ्या, मंदिराचा काही भाग आणि समाधीस्थळ हटवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. जागेची पाहणी आणि आखणी यापूर्वीच झाली असल्याने यंत्रणा येताच कामाला सुरुवात झाली. परमहंस कांतादाजी महाराज आणि परमहंस राजनारायण दासजी महाराज यांच्या ५०-६० वर्षे जुन्या समाधीस्थळाचे लोकवर्गणीतून जीर्णोद्धार करण्यात आले होते. हे मंदिर प्राचीन असल्याने येथे राज्य आणि परदेशातील भाविक दर्शनासाठी येत असतात. जीर्णोद्धारादरम्यान मंदिराचा काही भाग सरकारी सार्वजनिक जागा आणि खाजगी मालकीच्या जागेत बांधण्यात आला होता. या वादामुळे प्रकरण उच्च न्यायालयात पोहोचले. न्यायालयाने खासगी जागेवरील बांधकाम काढण्याचे आदेश मंदिर प्रशासन आणि ग्रामपंचायत प्रशासनाला दिले आहेत. मात्र, मंदिर प्रशासनाने कोणतीही तयारी न दर्शविल्याने ग्रामपंचायतीने नोटीस बजावून दुसऱ्या टप्प्यातील कारवाई सुरू केली आहे.

गावातील शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष पोलीस बंदोबस्त मागवण्यात आला असल्याची माहिती विकास अधिकारी प्रवीण ठाकरे यांनी दिली. चोख पोलीस बंदोबस्तात अतिक्रमण **(पान ४ वर)**



## पेट्रोल, डिझेल, गॅस दरवाढी विरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे धुळ्यात आंदोलन

**धुळे, दि.१७ (प्रतिनिधी)- केंद्र आणि राज्य सरकार महागाई नियंत्रणात आणण्यात अपयशी ठरली आहे. गेल्या काही महिन्यांपासुन पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या किंमतीत सतत वाढ होत आहे. इंधन महागल्यामुळे वाहतुक खर्चीक झाली. त्यामुळे प्रत्येक जिवनाश्यक वस्तुचे दर वाढले आहे. महागाईमुळे सर्वसामान्य कष्टकरी आणि मध्यमवर्गीयांचे जीवन जगणे कठीण झाले आहे. महागाई कमी करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार प्रयत्न करीत नसल्याने राष्ट्रवादी काँग्रसने सरकारचा धिक्कार केला आहे, असे म्हणत गांधी पुतळयाजवळ लक्षवेधी आंदोलन करण्यात आले.**

केंद्र आणि राज्य सरकार महागाई नियंत्रित करीत नसल्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे गुरूवारी राज्यभर आंदोलन करण्यात आले. धुळे शहरातील गांधी पुतळ्या जवळ दुपारी अकराच्या सुमारास पक्षाचे शहराध्यक्ष वाल्मीक मराठे यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले. यावेळी पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. महागाई नियंत्रित करत नसलेल्या केंद्र आणि राज्य सरकारचा आम्ही निषेध करीत आहोत, असे म्हणत आंदोलकांनी घरगुती गॅस सिलेंडरच्या प्रतिकृतीचे दहन केले. पेट्रोल, **(पान ४ वर)**

## भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एचआयव्हीग्रस्त वीस रुग्णांवर मोतिबिंदू शस्त्रक्रिया

**धुळे, दि.१७- श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकिय महाविद्यालयात मोतिबिंदू जनजागृती, उपचार अभियान नुकतेच संपन्न झाले. या अभियानांतर्गत एचआयव्ही बाधित २० रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. राज्यात अशा प्रकारची पहिलीच शस्त्रक्रिया झाली आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. मुकर्रम खान, डॉ.मुकेश सैनी यांनी रुग्णांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला.**




राज्य शासनातर्फे १०० दिवसांचा कृती आराखडा राबविण्यात येत आहे. यानिमित्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातर्फे हा उपक्रम राबविण्यात आला. या रुग्णांपैकी एक रुग्ण क्षयबाधित होता, तर ११ वर्षीय बालिकेवरही शस्त्रक्रिया करण्यात आली. एका महिला रुग्णाचा एक डोळा पूर्णपणे निकामी झाला होता, दुसऱ्या डोळ्यास मोतिबिंदू झाला होता. त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे, असे डॉ. खान यांनी सांगितले.

या रुग्णांवर रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.सयाजी भामरे, डॉ.माया **(पान ४ वर)**

## एकवीस एप्रिलला महिला लोकशाही दिन

नंदुरबार, दि.१७ (प्रतिनिधी)- महिलांच्या तक्रारी, अडचणींची सोडवणूक शासकीय यंत्रणेकडून करण्यासाठी व समाजातील पिडीत महिलांना मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी दरमहा जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत असून एप्रिल महिन्यात २१ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता रंगावली सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार येथे जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे, असे सदस्य सचिव महिला लोकशाही दिन तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विनोद वळवी यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

## सोनगीर-दोंडाईचा रस्ता वाहतुकीत बदल प्रशासनाकडून नवीन पर्यायी मार्गाची घोषणा

**सोनगीर दि.१७ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील सोनगीर-दोंडाईचा मार्गावरील वाहतुकीत जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. रस्त्याच्या सुधारणा कामांमुळे अवजड वाहनांसाठी नवीन मार्ग निश्चित करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी याबाबत आदेश जारी केले आहेत.**

सोनगीर-दोंडाईचा रस्त्याचे काम आशियाई विकास बँकेच्या आर्थिक सहाय्याने सुरू आहे. या कामात रस्त्याचे रुंदीकरण आणि पूल व मोऱ्यांचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. काँक्रिटीकरण केलेल्या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यावर, वाहतूक सुरू करण्यापूर्वी किमान २८ दिवस पाणी मारून क्युरिंग करणे आवश्यक आहे. यामुळे वाहतुकीत बदल करणे आवश्यक झाले होते.

असे आहेत नवीन मार्ग:- सोनगीर फाट्यावरून दोंडाईचा-शहादा-नंदुरबारकडे जाणारी अवजड वाहने आता नरडाणा-शिंदखेडा-दोंडाईचा मार्गे जातील. दोंडाईचा मार्गे चिमठाणे-सोनगीरकडे येणारी अवजड वाहने दोंडाईचा-शिंदखेडा-नरडाणा मार्गे वळवण्यात आली आहेत. या बदलामुळे कार, **(पान ४ वर)**

## नोंदणी, मुद्रांक दस्त हाताळणी शुल्कात वाढ

धुळे, दि.१७- नोंदणी व मुद्रांक विभागास बांधा वापरा हस्तांतरण करा' या तत्वावर खाजगीकरणाच्या माध्यमातून संगणकीकरण करणे, संगणकीकरणांतर्गत येणा-या हार्डवेअर, सॉफ्टवेअर कंझ्युमेबल्स, मनुष्यबळ यांच्या दरात त्याचप्रमाणे स्वीय प्रपंची लेख्यातून खर्च करावयाच्या बाबींमध्ये वाढ झालेली आहे. त्यामुळे नोंदणी व मुद्रांक विभागातील खाजगीकरणाच्या माध्यमातून येणारा खर्च भागविण्याकरिता दस्त हाताळणी शुल्क रु.२०/- वरुन रु.४०/- इतके निश्चित करण्यास शासन निर्णय १५ एप्रिल, २०२५ अन्वये मान्यता मिळालेली आहे. अशी माहिती नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक रविंद्र बिनवडे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. याप्रमाणे 'आय-सरिता' सॉफ्टवेअरमध्ये आवश्यक ते बदल व त्याची चाचणी करण्याची कार्यवाही एनआयसीकडून करण्यात आली आहे. या शासन निर्णयाची अंमलबजावणी धुळे जिल्ह्यात १७ एप्रिलपासून करण्यात येणार असून या बदलाची नागरीकांनी नोंद घ्यावी.

## क्षुल्लक कारणातून तरुणाचा खून नंदीरोड भागातील घटनेने खळबळ

**धुळे, दि.१७- दुचाकीचा कट लागल्याच्या क्षुल्लक कारणावरुन संशयितांनी एका अठरा वर्षीय युवकाचा सिमेंटकाँक्रिटीच्या रस्त्यावर डोके आपटून खून केल्याची धक्कादायक घटना शहरातील नंदीरोडवर काल रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

फैज अहमद मुरास हुसैन अन्वारी (वय १८) रा.ग.नं.७ निशात चौक, मच्छीबाजार असे या युवकाचे नाव असून त्याच्या नातेवाईकाने चाळीसगांव रोड पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे. काही संशयीतांना ताब्यात घेतल्याचे समजते. शहरातील ग.नं. ७ मधील मच्छीबाजार परिसरातील निशांत चौकात राहणारा फैज अहमद मुराद हुसैन अन्सारी हा काल रात्री नंदीरोड वरील एनर जिम जवळून दुचाकीने जात होता. यावेळी समोरुन येणाऱ्या वाहनाला कट लागल्याच्या कारणावरुन अज्ञात दोन जणांनी फैज अन्सारी यास बेदम मारहाण केली. शिवाय त्यास जीवेठार मारण्याच्या उद्देशाने दोन्ही हातांनी पकडून सिमेंट काँक्रीटच्या रोडवर त्याचे डोके पाच ते सहा वेळेस आदळले. यात फैज गंभीर जखमी झाला. यावेळी त्याच्या छातीवर लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन त्याला जीवेठार मारले. या प्रकरणी फैजचे नातेवाईक मोहम्मद साजीद अब्दुस लतीफ अन्सारी यांनी चाळीसगाव रोड पोलिसांत दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात दोन जणांविरोधात भारतीय न्याय संहिता कलम १०३, ११५ (२), ३५२, ३ (५) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. मयत फैज हा शहरातील एका मेडीकल स्टोअर्सवर कामाला होता.



दरम्यान, घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी राजकुमार उपासे, चाळीसगाव रोड पोलीस ठाण्याचे पोनि सुरेशकुमार घुसर, पोउनि हरिशचंद्र पाटील व चाळीसगाव रोड पोलीस ठाण्याच्या शोध पथकाने घटनास्थळी धाव घेतली होती. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी काही संशयीतांना ताब्यात घेतले असून त्यात अल्पवयीनांचा समावेश असल्याचे सांगण्यात येत आहे.

## आ.पावरा यांच्या हस्ते, चिंतनभाई पटेल यांच्या उपस्थितीत पिळोदा येथे विकासकामांचे भूमिपुजन

**शिरपूर, दि.१७- आमदार काशिराम पावरा यांच्या हस्ते व उद्योगपती चिंतनभाई पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत पिळोदा येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन सोहळा संपन्न झाला.**



यावेळी आमदार पावरा मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल व माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्यासह आम्ही शिरपूर तालुक्याच्या विकासासाठी अहोरात्र प्रयतक करत आहोत. तालुक्यातील प्रत्येक गावात विविध सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी आम्ही राज्य शासन, केंद्र शासनासह इतर अनेक प्रकारचे निधी मोठ्या प्रमाणात आणून गुणवत्ता व दर्जेदार कामे करत आहोत. शिरपूर तालुक्याच्या विकासासाठी व सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी आणि नेहमीच तत्पर असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

पिळोदा गावात आयोजित भूमिपूजन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी शिरपूर तालुक्याचे आमदार काशिराम दादा पावरा होते. प्रमुख मान्यवर म्हणून भारतीय जनता पार्टीचे शिरपूर शहराध्यक्ष तथा उद्योग पती चिंतनभाई अमरिशभाई पटेल उपस्थित होते. यावेळी प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणी संचालक जे. टी. पाटील, घोडसगाव सरपंच हुकुमचंद पाटील, भाजपा युवा मोर्चा शिरपूर ग्रामीण अध्यक्ष योगेश बोरसे, पिळोदा ग्रामपंचायत प्रशासक एस. एस. पवार, घोडसगाव उपसरपंच पितांबर धनगर, पिळोदा **(पान ४ वर)**

## सोनगीर येथे दीड लाख रुपयांच्या दहा शेळ्यांची चोरी

**सोनगीर दि.१७ (प्रतिनिधी) - येथील श्री संत सावता चौकातून अज्ञात चोरट्यांनी तब्बल दीड लाख रुपये किमतीच्या दहा बकऱ्या चोरून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी बकऱ्यांचे मालक अरुण भाईदास माळी (वय ५५) यांनी सोनगीर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, ही चोरी शनिवार, दि.१२ एप्रिल रोजी मध्यरात्री १ ते पहाटे ५ वाजेच्या दरम्यान घडली. श्री संत सावता चौकात श्री माळी यांच्या राहत्या घराशेजारी असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये नऊ सुर्ती आणि एक काठेवाडी अशा एकूण दहा बकऱ्या बांधलेल्या होत्या. या बकऱ्या दोरखंड आणि लोखंडी साखळीच्या साहाय्याने बांधलेल्या असताना अज्ञात चोरट्यांनी त्या चोरून नेल्या. या चोरी झालेल्या बकऱ्यांची एकूण किंमत सुमारे एक लाख पन्नास हजार रुपये आहे. बकरी मालक अरुण माळी यांना सकाळी उठल्यावर गोठ्यात बकऱ्या नसल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी तातडीने परिसरातील तसेच चाळीसगाव, शिरपूर, खेतिया आणि दोंडाईचा येथील बकरी बाजारात जाऊन शोध घेतला. मात्र, त्यांच्या बकऱ्या कुठेही आढळून न आल्याने त्यांनी अखेरीस सोनगीर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली आहे. सोनगीर पोलिसांनी अद्याप या घटनेची अधिकृत नोंद केलेली नसून, तपास सुरू आहे. या चोरीच्या घटनेमुळे परिसरातील शेळीपालन करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चोरीला गेलेल्या बकऱ्यांचा शोध घेऊन चोरट्यांना पकडण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

## दंडेवाले बाबा नगरात दोन गटात हाणामारी

धुळे, दि.१७- मोहाडी उपनगर परिसरातील दंडेवाले बाबा नगर गौंड वस्ती येथे दोन गटांत हाणामारी झाली. त्यात तिक्ष्ण हत्यारांसह लाकडी दांडक्यांचा वापर करण्यात आला. याप्रकरणी दोन्ही गटांनी परस्पर विरोधात तक्रार नोंदवली आहे.दिनेश सुनिल कासोदे यांनी दि. १६ एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, दंडेवाले बाबा नगरातील गौंड वस्तीत राहुल गुड्डु अंकुशे व गुड्डु राम अंकुशे या दोघांनी दिनेश कासोदे यांच्या वडीलांना शिवीगाळ करत धारदार वस्तुने तसेच लाथा बुक्क्यांनी दि.१५ एप्रिल रोजी रात्री आठ वाजेच्या सुमारास मारहाण केली. तसेच जिवे ठार **(पान ४ वर)**

**उपसंपादक पाहिजे**

वृत्तपत्र क्षेत्रातील अनुभवी, इन डिझाइन मध्ये पेज सेटअप करु शकणारा उपसंपादक पाहिजे. तसेच जिल्हा परिषद बीट प्रतिनिधी व क्राईम रिपोर्टर पाहिजे. समक्ष भेटा! सायंकाळी ६ ते ८

दै.आपला महाराष्ट्र
वीर सावरकर मार्ग, धुळे

**दिपक ज्वेलर्स**

सोने- 22 K -87,200 रु.+3% GST
सोने- 24 K -95,200 रु.+3% GST
चांदी- 01,0000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३




**!! शोक संदेश !!**

धुलिया निवासी मोहनलाल सत्यनारायणजी चौरसिया इनकी मातोश्री

**स्व.पार्वताबाई सत्यनारायणजी चौरसिया**

(वय ९२ वर्ष) इनका आज दि. १७/०४/२०२५ को सुबह १०.३० बजे. स्वर्गवास हुवा. उनकी अंतिम यात्रा शुक्रवार दि. १८/०४/२०२५ को सुबह ९ बजे. निवास्थान, ग.नं. ४,धुलिया से निकलेगी

निवासस्थान - ग.नं.४, चैनिरोड कॉर्नर, धुलिया

!! शोकाकुल !!
मोहनलाल सत्यनारायणजी चौरसिया
नंदलाल सत्यनारायणजी चौरसिया
शांतीलाल सत्यनारायणजी चौरसिया
संजय सत्यनारायणजी चौरसिया (संजय ट्रेडर्स)
स्वप्निल (टोनी) शंकरलाल चौरसिया
एवं चौरसिया परिवार, धुलिया मो. 94222 85387 / 93721 91999

# आपला महाराष्ट्र

## नगरपालिका सदस्यांना अच्छे दिन

राज्य सरकारने पुन्हा एकदा नगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगर परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अध्यक्षांना पायउतार करण्याचे अधिकार नगरसेवकांना प्रदान केले आहेत. याचा अर्थ असा की, स्थानिक स्वराज्य संस्थांचा अध्यक्ष जरी जनते मधून निवडून आला असला तरी त्याला पाय उतार करण्यासाठी नगरसेवकांना किंवा निवडून आलेल्या सदस्यांना अधिकार प्रदान करून त्यांचा वापर होईल. मंत्री मंडळाच्या नुकत्याच झालेल्या साप्ताहिक बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. लवकरच तसा अध्यादेश काढला जाणार आहे. भविष्यात या निर्णयामुळे निवडून येणाऱ्या नगरसेवकांची बाजारातील किंमत वाढणार असून एखाद्या अध्यक्षाला पाय उतार करणे किंवा दुसरा पदावर बसविणे यासाठी होणाऱ्या चढाओढीत घोडे बाजार निश्चितपणे होणार आहे. ही पद्धत पूर्वीच्या अनेक सरकारांनी अमलात आणली होती. एखादे सरकार पायउतार झाले त्या जागी नवे सरकार आले तर आधीच्या सरकारचे सगळे निर्णय नवे सरकार रद्द करीत असे. कधी थेट निवडणूक पद्धतीतून अध्यक्ष निवडून आणायचा तर कधी सदस्यांमधून निवडून आणायचा असे सारखे निर्णय बदलत असतात. विद्यमान राज्य सरकारच्या मनात नगरसेवकांना हे अधिकार प्रदान करण्याचा निर्णय निर्माण झाला. त्यामुळे नगरसेवकांना अच्छे दिन येणार आहेत. अनेक वेळा असे निर्णय झाले. त्यातून घोडेबाजाराचा जन्म झाला. आणि नगरसेवक मालामाल झाले. अशी अनेक गावे आणि शहरे आहेत की नगरसेवक निवडून आला तेव्हा नगरसेवक कफल्लक होता. मात्र पाच वर्षात तो कोट्याधीश झाला. धुळे नगरपालिका क्षेत्रात महापालिका अस्तित्वात घेण्यापूर्वी मोठी राजकीय स्पर्धा होती. त्यावेळी अपक्ष नगरसेवकांची १४ लोकांची एक फळी निवडून आली होती. तिला ढकल गँग असे म्हणत असत. या गँग मधील सदस्य नगराध्यक्षांना पायउतार करायला वापरले जात असत. तीच गँग नव्या अध्यक्षांना निवडून आणण्यासाठी उपयोगाची ठरत.असे. त्या काळात घोडेबाजाराचा दर ४० हजार रुपये होता. अशाप्रकारे दरवर्षी ऐंशी हजार रुपये एवढी त्यांची कमाई होत असे. ही बाब सरकारच्या लक्षात आल्यानंतर नवे सरकार आले आणि त्या सरकारने नगराध्यक्ष थेट निवडून आणण्याचे फर्मान काढले. तसेच किमान अडीच वर्षे त्याच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आणता येणार नाही असाही कायदा केला. त्यामुळे ढकल गँग ची पंचाईत झाली. अशा ढकल गँग प्रत्येक शहरात निर्माण झालेल्या होत्या. त्यांच्या तक्रारी येऊ लागल्या. लोकप्रतिनिधींनी त्यांची सोय करण्यासाठी थेट त्यांना नगराध्यक्षांना पदभ्रष्ट करण्याचे अधिकार दिले. राज्य सरकारने परवा यासंबंधी घेतलेला निर्णय याच पद्धतीचा होता. नगरपालिका आणि नगरपरिषद बरोबरच ग्रामपंचायतचे सरपंच देखील थेट निवडून यावेत असा निर्णय झाला. त्यामुळे ग्रामपंचायतच्या सदस्यांची देखील पंचाईत झाली. तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी त्यांची अवस्था झाली. राज्य सरकारने पुन्हा हा निर्णय रद्द केला. आणि निवडून आलेल्या सदस्यांना सरपंचाला पदभ्रष्ट करण्याचे अधिकार देण्यात आले. त्यामुळे सदस्यांची दुकानदारी पुन्हा सुरू झाली. ग्रामपंचायत च्या कार्यक्षेत्रात सध्या केंद्राकडून भरपूर अनुदाने येतात. त्यामुळे स्वाभाविकच सरपंचाची आणि निवडून आलेल्या सदस्यांची कमाई होते. परिणामी ग्रामपंचायत च्या निवडणुकीत प्रचंड संघर्ष चढाओढ, आपसातील भानगडी, एकमेकांचे उणे दुणे, जुने वैमनस्य, आर्थिक व्यवहारातील भानगडी असे सगळे उफाळून येत असे. राजकीय पक्षांचे उमेदवार ग्रामपंचायत, नगरपालिका आणि नगरपरिषदा, नगरपंचायती या स्वायत्त संस्थांच्या निवडणुकीत उभे राहतात हिच मुळात चूक आहे यामुळे देखील लोकांची मानसिकता बदलली आहे. प्रत्येकाचा भाव वधारला असून निवडून येणाराला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पदावर निवडून येणारे सरपंच किंवा अध्यक्ष निवडून आलेल्या सदस्यांची मन धरणी करतात, सोबत बॅग घेऊन जातात. त्याची किंमत ठरवतात. त्याला विकत घेतात. निवडून येतात. यास राजकीय पक्षातून निवडून आलेल्या वरिष्ठ लोकप्रतिनिधींची फूस असते. सरकार मधील निवडून आलेले लोकप्रतिनिधी त्यांच्या समर्थकांच्या कमाईची काळजी घेतात आणि अशा प्रकारचे निर्णय घेतात. ही बाब लोकशाहीला मारक आहे. साखर कारखाने किंवा अन्य कुठल्याही सहकारी संस्थांच्या निवडणुका होतात तेव्हा निवडून आलेल्या सदस्यांना पर्यटन घडवून आणले जाते. त्यात कोट्यावधी रुपयाचा खर्च करतात. नंतर जत्थ्याने येऊन मतदान करतात. ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी या पद्धतीने संबंधिताला निवडून देतात. तो निवडून आल्यानंतर झालेला खर्च वसूल करतो, भ्रष्ट परंपरा चालू होतात. या पद्धतीमुळे सारा देश पोखरून निघालेला आहे.

आता तर नगरपालिका नगरपरिषद महापालिका येथील नगरसेवकांना बाहेर नेऊन त्यांची बडदास्त ठेवली जाते. त्यातही लाखो रुपये खर्च होतात. ते सुद्धा निवडून आल्यानंतर विकास कामातून करोडो रुपये कमावतात. ही आजची कार्यपद्धती आहे. याहून आश्चर्य जनक बाब म्हणजे आता तर आमदारच पळविले जातात. सुरतला जातात, आसाम मध्ये जातात, कामाख्याचे दर्शन घेतात. त्यांना चाळीस खोके असे काहीतरी मिळते. वरून मंत्री पद देखील मिळते. तिथून येऊन ते सरकार पाडतात आणि नवे सरकार बनवतात. अशा पद्धतीची नवी संकल्पना अलीकडे रूढ झालेली आहे. विशेष म्हणजे अशा प्रकारचे भ्रष्ट लोक हे तत्त्वज्ञान सांगतात. जनकल्याणांचे आणि विकासाचे निर्णय ते घेतात. ही लोकशाहीची प्रचंड थट्टा आपल्या राज्यात प्रस्थापित झालेली आहे. विद्यमान राजकीय व्यवस्थेने ती केलेली आहे. या संपूर्ण प्रक्रियेला हे लोक नैतिकता म्हणतात हे विशेष म्हणावे लागेल. ही तथाकथित नैतिकता राजकीय क्षेत्रातील पुढाऱ्यांना आता नगरपालिका किंवा नगरपरिषदा पर्यंत पाझरत न्यावयाची आहे. म्हणजे खालच्या स्तरावर नीतिमत्तेच्या दृष्टीने जरा बऱ्यापैकी परिस्थिती होती ती राजकीय पक्षाच्या पुढाऱ्यांना अबाधित ठेवायची नाही. सारा समाजच कशा पद्धतीने नासवता येईल यात त्यांना अधिक रस आहे. त्यांच्या दृष्टीने राजकारण हा खेळ झाला असल्याने सगळीकडे भ्रष्टाचार ही काही नवीन बाब नाही असेच त्यांना वाटते. ही परिस्थिती सुधारण्याची शक्यता सध्या तरी दिसत नाही. कारण राजकारणात जोपर्यंत पैशांचा वापर होतो तोपर्यंत गुंड गुंड या क्षेत्रात येत राहतील. गेल्या काही वर्षांपासून पैशाला धर्माची जोड देऊन धार्मिक उन्मादात बहुजन तरुणांचा वापर मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे. त्यांना त्यासाठी पोसले जात आहे. कोंबड्यांची जशी झुंज लावून देतात. आणि लावून देणारे गंमत बघतात . तसेच धर्मा धर्मात आणि जाती जातीत द्वेष निर्माण करून पुढारी राजकारणाचा खेळ खेळतात. राज्याच्या सरकारने नगराध्यक्षांना पायउतार करण्याचे अधिकार सदस्यांना प्रदान केले आहेत तो या खेळाचाच (पान ३ वर)

## धुळ्यातील अहिरराव दाम्पत्यांची संगीत विशारद मुलीला अनोखी श्रध्दांजली; रसिकांची उपस्थिती

**धुळे, दि.१७- येथील रविंद्र अहिरराव व सौ.आशा अहिरराव हे दांपत्य आपली स्वर्गवासी मुलगी पल्लवीच्या पुण्यतिथी निमित्त दरवर्षी स्वरांजली सांगितिक कार्यक्रम आयोजित करुन आपल्या स्वर्गवासी संगीत विशारद मुलीला अनोखी श्रध्दांजली वाहून तिचा छंद हा ह्या कार्यक्रमाच्या रुपाने जोपासतात.**



गाण्याचा प्रचंड छंद, मधुर आवाज, उत्तम हस्ताक्षर, पदवीधर, आकाशवाणी तसेच अनेक सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमात पल्लवीने केलेल्या सादरी करणाने अल्पावधीत लोकप्रिय झालेल्या मुलीचे आकस्मित निधन झाल्यानंतर अहिरराव दांपत्य दरवर्षी हा कार्यक्रम आयोजित करत असतात. या वर्षीसुध्दा आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक व माजी प्राचार्य बी.बी.महाजनसर हे होते. पल्लवी संगीत अकादमीचे विद्यार्थी प्रणव पाटील, विजय नन्नवरे, पंडीतराव ठाकरे, श्रीरंग मसने, संतोष एंडाईत, विजय माळी, हर्षिका कापडे, कविता पाठक, विभूती जोशी, मनस्वी पाटील, संध्या गायकवाड, कृष्णा गायकवाड, तीर्थराज पवार, भावना पाटील, हर्षदा बोरगांवकर, सीमा ठाकुर, जय उफाडे, आर्या आहेर, परीस पाटील, आकाश उफाडे, निवृत्ती सोनवणे, आशुतोष पुरकर, नंदकुमार कुळकर्णी, सुखश्री बोरगांवकर यांनी विविध राग गायन केले त्यात प्रामुख्याने रागयमन, चारुकेशी, भैरवी, भिमपलासी, देस, खमाज, दुर्गा इ.रागांवर आधारीत गायन केले. तसेच काही विद्यार्थ्यांनी भावगीते, भक्तीगीते व चित्रपटांची गीते सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.

ह्या कार्यक्रमाला माजी खा.डॉ. सुभाष भामरे, मा.जि.प.सदस्य बापू खलाणे, बी.एन.बिरारी, माजी नगरसेवक सूभाष जगजाप, माजी नगरसेविका भारती माळी, माजी नगरसेवक मिलींद सोनवणे, विश्राम बिरारी, प्राचार्य बी.एच.जाधव, प्रा.अण्णा माळी, देवेंद्र बापु पाटील, मुन्ना वाडीले, प्राचार्य व्ही.बी.पाटील, उदय अण्णा महाजन, सतिष पाटील, दिनेश बापु माळी, प्रकाश माळी, कैलास बागुल, श्याम महाजन, पंकज महाजन इ.उपस्थित होते, कार्यक्रमाचे प्रास्तविक अमोल माळी यांनी तर सुत्रसंचालन हर्षदा बोरगांवकर यांनी केले. यशस्वीतेसाठी मनोज बोरगांवकर, किरण माळी आदिंनी परिश्रम घेतले.

## आरोग्य दिनानिमित्त दहिवेल प्राथमिक केंद्रात गरोदर महिलांसाठी तपासणी शिबिर संपन्न



**साक्री, दि.१७ (प्रतिनिधी)- साक्री तालुक्यात जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने दहीवेल येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात गरोदर महिलांचे तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर उपक्रम आयसीडीएस विभाग व जिल्हा आरोग्य विभागाच्या सहकार्याने तसेच सेल्फ केअर फॉर न्यू मॉम्स अँड किड्स अंडर प्रकल्पाच्या माध्यमातून हे शिबिर घेण्यात आले.**

यावेळी साक्री तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.हितेंद्र गायकवाड व दहिवेल प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.रमेश गवळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या शिबिरात गरोदर महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी गरोदर महिलांचे रक्त, रक्तदाब, वजन व इतर अत्यावश्यक तपासण्या करण्यात आल्या. तसेच गरोदर महिलांना पौष्टिक आहार, स्तनपानाचे योग्य तंत्र, उन्हाळ्यातील काळजी, डायरियावर उपाययोजना व झिंक आणि ओआरएस चा वापर कसा करावा याबाबत माहिती देण्यात आली. त्यानंतर तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. हितेंद्र गायकवाड यांनी उष्माघात कक्षाबाबत माहिती दिली. जर कुणाला उन्हाचा त्रास होत असेल, तर लगेच जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधून उपचार घ्यावेत असे नमूद केले. त्यानंतर दहिवेल येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे अधिकारी डॉ.रमेश गवळी यांनी गर्भावस्थेत असणाऱ्या महिलांनी पिण्याच्या पाण्याकडे लक्ष द्यावे.तसेच आहार, स्तनपान करताना बाळाला कसे पकडावे हे प्रात्यक्षिक करून दाखवले. त्यानंतर उन्हाळ्यात लहान बालकांमध्ये डायरियाचे प्रमाण वाढते; त्यामुळे त्यांना उन्हापासून वाचवणे,ओआरएस चे द्रावण व झिंकच्या गोळ्यांचे योग्यप्रकारे वितरण करणे गरजेचे असल्याचे नमूद केले. यावेळी आरोग्य विभागात चांगले काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा तसेच आशा व अंगणवाडी सेविकांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकल्पाचे स्टेट मॅनेजर दिनेश प्रजापती, डिस्ट्रिक्ट लीड श्रीमती धनश्री श्रीमंतावर, ब्लॉक ऑफिसर किशोर कुमावत, सी.एच.डब्ल्यू. अंजना वळवी, कल्पना वसावे, हिरा वळवी, प्रतिभा बैसाणे, सलमा पठाण, तसेच आशा सेविका, अंगणवाडी सेविका आणि आरोग्य विभागाचे कर्मचार्यांनी सहकार्य केले. यावेळी अंगणवाडी सेविका, ए.एन.एम., आशा सेविका व इतर आरोग्य कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

## भिमशक्ती मित्र मंडळाच्यावतीने दैठणकर नगरात अनोखा देखावा

**धुळे, दि.१७- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त देवपुरातील वलवाडी शिवारात दैठणकर नगरातील भिमाई चौकात कार्यक्रम झाला. भिमशक्ती मित्र मंडळाच्या वतीने यावर्षी थाटलेली तथागत गौतम बुद्ध यांचे प्रतिमा आणि संसद भवनाच्या इमारती व मुलांच्या शिक्षणाकरिता बाबासाहेबांनी दिलेल्या शाळेकडील मार्ग असा भव्य आरास लक्षवेधी ठरली.**




मार्ग भिमाचा, यशस्वी जीवनाचा असे नाव या देखावाला दिले होते. तब्बल तीन दिवसांत कुठल्या आर्किटेक यांच्या मदतीने न करतात स्वतः मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेऊन देखावा उभा केला. याप्रसंगी भाजपा प्रदेश चिटणीस डॉ.सुशिल महाजन, वलवाडीचे माजी सरपंच छोटु चौधरी, माजी सरपंच रवींद्र वाघ, माजी उपसरपंच जगदीश चव्हाण, मयुर देवरे, भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष विजय देवरे, बापु मिस्त्री, माजी नगरसेवक गोपीचंद पाटील, रंगनाथ ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष रणजित भोसले, पोलिस कर्मचारी कबीर शेख, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष यशवंत हरणे, खैरनार सर आदींनी भेट दिली. कार्यक्रम यशस्वीकरण्यासाठी भटु वाघ, नितीन बोरसे, मनोज बैसाणे, वाल्मिक बोरसे, जिभाऊ सरदार, निंबा ब्राह्मणे, भैय्या शिंदे, विशाल वाघ, बबलु बोरसे, रवींद्र बोरसे, नितीन जगदेव, मयुर केदार, राज सैंदाणे, निलेश अहिरे, भैय्या बोरसे, बॉबी शिंदे, वाल्मिक वाघ,संतोष शिंदे, भाऊलाल वाघ आदीसह पदाधिकाऱ्यांनी घेतले.



## मेहतर वस्तीत बाबासाहेबांना अभिवादन

**नंदुरबार, दि.१७ (प्रतिनिधी)- शहरातील मेहतर वस्ती परिसरात स्वर्गवासी रमेश कडोसे परिवारातर्फे भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, भारतरतक डॉ. बाबासाहेब भीमराव आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**

याप्रसंगी नंदुरबार जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा शिवसेना जिल्हा प्रमुख एडवोकेट राम रघुवंशी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. कार्यक्रमास माजी नगरसेवक दीपक दिघे, माजी नगराध्यक्षा श्रीमती शीला कडोसे, सामाजिक कार्यकर्ता कमल कडोसे व परिसरातील सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. अभिवादन कार्यक्रमाचे संयोजन कमल कडोसे आणि सहकाऱ्यांनी केले.

## पटेल प्राथमिक शाळेत उन्हाळी क्रीडा शिबीर

**तऱ्हाडी, दि.१७ (प्रतिनिधी) - शिरपूर शहरातील आर.सी. पटेल प्राथमिक शाळेत उन्हाळी क्रीडा शिबिराला सुरुवात झाली आहे. सदर उन्हाळी क्रीडा शिबिरात प्राथमिकच्या ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे.**



उन्हाळी क्रीडा शिबिरात सकाळी योगासनाने सुरुवात होते. सदर क्रीडा शिबिरात योगासनानंतर विविध फनी गेम्स तसेच ऍक्टिव्हिटी घेण्यात येतात. या सोबतच क्रिकेट, फुटबॉल, बास्केटबॉल,कबड्डी, हॉलीबॉल,बॅडमिंटन,कराटे हँडबॉल, खो-खो, कॅरम असे वेगवेगळे खेळ खेळवले जातात. तर सांस्कृतिक प्रकारात नृत्य, पेंटिंग, गायन ,वादन अशा विविध प्रकारात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. या खेळासाठी व सांस्कृतिक प्रकारासाठी स्वतंत्र प्रशिक्षक नेमण्यात आलेले आहेत.या प्रशिक्षकांमार्फत सदर खेळ व सांस्कृतिक ऍक्टिव्हिटीज शिकवल्या जातात. सदर उन्हाळी क्रीडा शिबिर हे १५ एप्रिल ते ५ मे पर्यंत सुरू असणार आहे. यादरम्यान उन्हाळी क्रीडा शिबिरात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. उन्हाळी क्रीडा शिबिरात विद्यार्थ्यांनी ज्या क्रीडा प्रकारात भाग घेतला आहे ते वर्षभर प्रशिक्षक मार्गदर्शन करणार आहेत. सदर उन्हाळी क्रीडा शिबिर हे विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदीप गहिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. यासाठी क्रीडा प्रमुख वसंत भामरे, गणेश चौधरी, संजय पटेल, अशोक पाटील, किशोर राजपूत, प्रशांत चौधरी, विनोद माळी, अरुण हातेडकर, सुशिला मराठे, सुवर्णा सुर्वे, रोशनी पावरा आदि मेहनत घेत आहेत.

## दुचाकी लंपास

धुळे, दि.१७- शिंदखेडा तालुक्यातील धमाणे गावात घरासमोर लावलेली दुचाकी अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. गोपाल विजयसिंग राजपूत यांनी दि.१६ एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, धमाणे गावात घरासमोर दि.८ एप्रिल रोजी दुचाकी क्र.एमएच १८/बीवाय-६०५८ लावलेली होती.




प्रकाश में आज प्रेमरोग











## शब्दकोडे क्रमांक : २१४०



**आडवे शब्द :** १.मुखडा ३.वस्तु ४.शुभकारक ७.जड ९.सुसर १०.पाठीचा कणा १२.लेप १४.लहान १५.□डजोड १८.हाक १९.बुट घालण्यापूर्वी पा□□ घाल□□ २०.□ीळ २२.बारा वर्षाचा काळ २४.सोब□ २५.मुख्य गा□कासोब□ गाणारा समूह गा□कांचा □फा २७.रुदीर २८.किव २९.परीक्षा ३१.सुगंध ३३. व्याधी ३५.विश्वासपात्र ३७.ज्याचे मोल कर□ □□ नाही असा ३८.१८० मिनीटांचा काळ ४१.एक च□ुर्थांश हिस्सा ४२.एक हिंदी सिनेमा '- - - - पार' ४४.रावणाचे निवास स्थान ४८.उर्दू□-गर्व ४९.आरोळी ५०.चुंबन ५१.कोकणा□ सादर होणारे मुख्य नाट्यप्रकार ५२.एक पवित्र भार□ी□ नदी ५३.गोविंदा,करीष्मा कपूर □ांचा एक सिनेमा

**उभे शब्द :** १.शिष्य २.लंकाधिपती ३.चा□ना ४.पृथ्वीवासि□ांस वस्तीसाठी खुणावणारा एक ग्रह ५.फळातील मगज ६.मिरची पावडर ८.टोल १०.मनमोहवून टाकणारे ११.काव्य करणारा १२.अवधी, वेळ १३.शह १६.महेश कोठारे,मानसी नाईक, पुष्कर जोग,आदीत्य रेडीज □ांचा एक सिनेमा १७.तग २१.वाकडा-तिकडा नसलेला २३.काटकसर करून वाचवलेल्या पैशातून केलेला खर्च २६.पावसाची झड ३०.एक मराठी सिनेमा '- - - दामोदर परांजपे' ३२.उपवासाला फराळ म्हणून वापरतात तो तांदूळ ३३.प्रजा ३४.जास्त ३६.श्वास घेण्याची क्रि□ा ३७.स्विकार ३९.नुतन ४०.सराव ४३.एक अरबी चलन ४५.भीक मागणारा ४६.मनापासून जोपासलेली आवड ४७.ग्राम ४९.गिरणीचा सा□रन ५० .काहीही बोलता न □णारा

### शब्दकोडे क्रमांक : २१३९ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| का | र | ण | | मु | ला | य | म | | मे | ळ | |
| को | स | | अं | क | | ज्ञ | | सा | थी | | पो |
| री | | बो | | □ | गा | | वा | □ा | | सा | र |
| | का | र | ना | मा | | ख | प | | ति | रं | गा |
| बा | पू | | ग | | खो | | र | वा | न | गी | |
| | र | या | | ज | ल | म | | स | □ा | | वि |
| मं | | मि | ल | न | | का | म | ना | | ना | ना |
| □ा | मि | नी | | म | र | | क्ता | | भू | | का |
| की | स | | ज्ञा | त | | वि | | अ | गो | □ | र |
| नी | | ती | न | | गु | ला | ब | | ल | | ण |
| | शो | र | | □ा | | य | म | ला | | बा | |
| पा | क | | बा | स | म | ती | | ट | र | बू | ज |

पान १ वरुन

## दोन कलमांच्या अंमलबजावणीस स्थगिती

उल्लेख करत सर्वोच्च न्यायालयाने यातल्या फक्त पाच याचिकाच प्रातिनिधिक म्हणून स्वीकारल्या जाऊन त्यावरच सुनावणी घेतली जाईल. यासंदर्भात याचिकाकर्त्यांनी सर्व याचिकांमधून पाच याचिका प्रातिनिधिक म्हणून निवडून न्यायालयाला सादर करण्यास सहमती दर्शवली असल्याचेही न्यायालयाने यावेळी नमूद केले.

**पुढील सुनावणी ५ मे रोजी**

सुनावणीदरम्यान केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाकडे सात दिवसांचा अवधी मागितल्यानंतर न्यायालयाने त्याला मंजुरी दिली आहे. तसेच, यानंतरची या प्रकरणाची सुनावणी ५ मे रोजी दुपारी २ वाजता ठेवण्यात आली आहे. सध्याचे सरन्यायाधीश संजीव खन्ना येत्या १४ मे रोजी निवृत्त होत असून त्याआधीच या प्रकरणाची सुनावणी घेतली जाईल.

**वक्फ कायद्यावर पूर्ण स्थगिती नाही**

दरम्यान, आजच्या अंतरिम आदेशांन्वये पूर्ण कायद्यावर कोणत्याही प्रकारे स्थगिती आणली जात नसल्याचे सरन्यायाधीशांनी यावेळी स्पष्ट केलें. कुणीतरी कायद्यावर पूर्ण स्थगितीची मागणी केली. पण आम्ही तशी स्थगिती लागू करत नाही आहोत. आज आम्हाला परिस्थिती बदलू द्यायची नाहीये. पाच वर्ष इस्लामचे पालन करण्याची अटही कायद्यात आहे. तिच्यावर स्थगिती आणलेली नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने यावेळी स्पष्ट केले.

## आ.रोहित पवारांची धुळे, शिरपूरला भेट

मैदानावर वर्षभरात विविध क्रिकेट स्पर्धा घेण्यात येतील असे त्यांनी यावेळी सांगितले.

धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या कुंडाणे येथील मैदानावर १६ एप्रिल रोजी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आमदार रोहित पवार यांनी भेट दिली. यावेळी धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष भूपेशभाई पटेल, मुख्य सल्लागार माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, सचिव प्रितेश पटेल, इतर कार्यकारिणी सदस्य, पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी आमदार रोहित पवार यांनी मैदान व उपलब्ध असलेल्या सोयी सुविधांची माहिती जाणून घेतली.

धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशन ही मागील २० वर्षापासून खेळाडूंना प्रशिक्षण देत आहे. धुळे जिल्ह्याकडून प्रशिक्षण घेऊन खेळाडू हे राज्यभरात विविध ठिकाणी क्रिकेट स्पर्धांसाठी यशस्वीपणे खेळाचे प्रदर्शन करतात. धुळे जिल्ह्यातील चांगले, गुणवंत व दर्जेदार खेळाडू तयार करण्याचे काम धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमातून करण्यात येते. धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशन मार्फत विविध सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. असोसिएशनचे अध्यक्ष भूपेशभाई पटेल, मुख्य सल्लागार माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांच्या प्रयत्नाने ९६ लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याबद्दल सर्व पदाधिकारी, क्रिकेटपटू, क्रिकेट चाहते यांनी आनंद व्यक्त केला आहे.

## मंदिराचे अतिक्रमण बंदोबस्तात काढले

काढण्याचे काम सुरू असताना काही काळ भक्तांचा रोष दिसून आला, परंतु न्यायालयाच्या आदेशामुळे शांततेत कारवाई झाली. नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.पहिल्या कारवाईत ध्वजस्तंभाचा पाया काढण्यात आला होता. आज उर्वरित ध्वज कटर मशीनने कापून खांब काढण्यात आला. दुपारपर्यंत अतिक्रमित ओटा आणि पायऱ्या तोडण्याचे काम सुरू होते. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी साक्री (धुळे ग्रामीण विभाग) संजय बामरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कापडणीस, पोलीस उपनिरीक्षक संदीप ठाकरे, रवींद्र बागुल, प्रशांत ताकाटे आणि धुळे येथील दंगल नियंत्रण पथक उपस्थित होते.ग्राम विकास अधिकारी प्रवीण ठाकरे यांनी सांगितले की, उच्च न्यायालयाने अतिक्रमण काढण्याचे आदेश दिल्यानंतर मंदिराच्या ट्रस्टींना स्वतःहून अतिक्रमण काढण्यासाठी नोटीस दिली होती. पहिल्या कारवाईनंतरही ट्रस्टींनी दुर्लक्ष केल्यामुळे ग्रामपंचायतीने पोलीस बंदोबस्तात कारवाई सुरू केली आहे.दरम्यान, सदर अतिक्रमण विरोधी कारवाई थांबवण्यात यावी अशी लेखी विनंती मंदिर प्रशासनाने मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत प्रशासन यांच्याकडे केली आहे. आजच्या कार्यवाहीत मंदिरासमोरील पायऱ्या काढून घेण्यात आल्यामुळे भाविकांना मंदिरात जाता येणार नसल्याचे मंदिर प्रशासनाचे म्हणणे आहे.

## वीस रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया

वसईकर, डॉ. अमिता रानडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ.अजित पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. खान, डॉ.सैनी यांच्यासह डॉ. आस्मा फरहीन, डॉ.जिवांक्षा पोवार, डॉ.निकिता वसावे, डॉ.अंकिता पटेल, डॉ.विनोद धूत, डॉ.अमोल घुले, डॉ.निकिता इंगोले, डॉ. आदिती कासट, डॉ.अनंत मांडवे, डॉ.आयशा शेख यांनी औषधोपचार केले. त्यांना अधिसेविका अरुणा भराडे, साधना पाडवी, प्रवीण माळी, अतुल आगमकर, नीलेश वाडेकर, पुष्पा कुवर, नीलम धूम, विलास गावित, नम्रता वळवी, अक्षय माळी, रुकसाना शेख यांनी सहकार्य केले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या उपक्रमाबद्दल जिल्हाधिकारी पापळकर यांनी समाधान व्यक्त करून कोणताही रुग्ण औषधोपचाराविना राहू नये, सर्वसामान्यांचे जीवनमान अधिक सुकर होण्यासाठी नियोजन रुग्णालयाने करावे, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

## राष्ट्रवादी काँग्रेसचे धुळ्यात आंदोलन

डिझेल आणि गॅस वाढल्यामुळे महागाई वाढली आहे. इंधन दरवाढीमुळे प्रत्येक जिवनाश्यक वस्तुची किंमत वाढली आहे. त्याचवेळी कष्टक-यांच्या मिळकतीत मात्र वाढ झालेली नाही. सरकार या गोष्टीचा विचार करीत नसल्याने आम्ही लक्षवेधी आंदोलन केले आहे. सरकारने दखल घेतली नाही तर यापुढच्या टप्प्यात आंदोलनाची तिव्रता वाढेल, असे स्पष्टीकरण आंदोलकांनी यावेळी दिले.

## सोनगीर-दोंडाईचा रस्ता वाहतुकीत बदल

जीप, ट्रॅक्टर, रिक्षा आणि एसटी बसेस यांच्या वाहतुकीत कोणताही बदल होणार नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. हे बदल १६ एप्रिल २०२५ पासून लागू झाले असून पुढील आदेश येईपर्यंत कायम राहतील. जिल्हा प्रशासनाने सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पोलीस प्रशासनाला आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत, ज्यात योग्य ठिकाणी बॅरिकेड्स आणि वाहतूक चिन्हे लावणे इत्यादींचा समावेश आहे. रस्त्याचे काम विहित वेळेत पूर्ण करण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आले आहेत.

## विकास कामांचे भूमिपुजन

गावातील आजी माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ, जापोरा माजी उपसरपंच संजय पाटील, भाजपा सरचिटणीस जितेंद्र सूर्यवंशी, राज देशमुख व अनेक मान्यवर उपस्थित होते.

आ.पावरा यांच्या हस्ते व उद्योगपती चिंतनभाई पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत विकासकामांचे भूमिपूजन झाले. माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांच्या प्रयत्नाने तलाठी कार्यालयासाठी २५ लाख रुपये, मातोश्री बाळासाहेब ठाकरे ग्रामपंचायत भवन योजना अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालयासाठी २५ लाख रुपये, आमदार अमरिशभाई पटेल यांच्या निधीतून स्मशानभूमी बांधकामासाठी १० लाख रुपये, रस्ता काँक्रिटीकरणासाठी ५ लाख रुपये, सामाजिक न्याय विभागातून भाईंच्या प्रयतकाने दलित वस्तीत विद्युतीकरण करणे १० लाख रुपये, आमदार काशिराम दादा पावरा यांच्या निधीतून सामाजिक सभागृह बांधकाम करण्यासाठी २० लाख रुपये, पंचायत समिती सदस्य सौ. धनश्री योगेश बोरसे यांच्या निधीतून रस्ता काँक्रिटीकरणासाठी ३ लाख रुपये, गाव अंतर्गत पोल व लाईट लावणे ३ लाख रुपये, पीव्हीसी गटार बांधकामासाठी ३ लाख रुपये अशा विविध विकास कामांचे भूमिपूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविकात योगेश बोरसे यांनी पिळोदा गावासाठी विविध विकास कामांसाठी भरघोस निधी मंजूर करून दिल्याबद्दल आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम दादा पावरा यांचे ऋण व्यक्त करून गावाच्या विकासासाठी सर्व मिळून आम्ही प्रयतक्शील राहू असे मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन गोपाळ सर, आभार व्ही. एच.परदेशी यांनी मानले.

## मोहाडीतील सराईत गुन्हेगारास अटक

धुळे, दि. १७ (प्रतिनिधी) महाराष्ट्र धोकेदायक कारवाया प्रतिबंध कायदयान्वये मोहाडी उपनगरातील सराईत गुन्हेगार रोहित नारायण वाघमोडे उर्फ भेंडया याला पोलिसांनी गजाआड केले आहे. रोहित वाघमोडेच्या विरोधात मोहाडी पोलिस ठाण्यात गेल्या दोन वर्षात निरनिराळे सहा गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल झाले आहेत. परंतु रोहित वाघमोडे हा बेपत्ता होता. मोहाडी उपनगरातील दंडेवाले बाबा नगर परिसरात राहणारा रोहित वाघमोडे उर्फ भेंडया हा सराईत गुन्हेगार झाला आहे. मोहाडी उपनगर पोलिस ठाण्यात २०२३ ते २०२५ या दोन वर्षात त्याच्याविरोधात निरनिराळे सहा गंभीर गुन्हे दाखल झाले. गुन्हे दाखल झाल्यानंतर रोहित वाघमोडे बेपत्ता होता. परंतु जिल्हा पोलिस प्रमुखांच्या सुचनेनंतर रोहित वाघमोडेच्या विरोधात महाराष्ट्र धोकेदायक कारवाई प्रतिबंध कायदयान्वये कारवाई करण्यात आली. त्याला अटक केली आहे. त्याच्याकडून गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडवितांना जे साहित्य वापरले गेले ते जप्त करण्यात आले आहे. रोहित वाघमोडेवर कारवाई झाल्यामुळे इतर सराईत गुन्हेगारांवर चाप बसेल, अशी अपेक्षा पोलिसांना आहे.

पान १ वरुन

## राज्य मंत्रिमंडळाची चौंडीला बैठक

प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी बुधवारी चौंडी येथे भेट देऊन पाहणी केली तसेच मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. चौंडी येथे मंत्रिमंडळाची बैठक होण्याच्या दृष्टीने आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने त्या तात्पुरत्या स्वरूपात निर्माण करण्यासाठी अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या. मंत्रिमंडळाची बैठक चौंडी येथे होणार असल्याची तारीख राज्य सरकारकडून अद्याप जाहीर करण्यात आली नसली तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार दि.२९ एप्रिलला ही बैठक होणार आहे. मंत्रिमंडळासाठी उपस्थित राहणारे वरिष्ठ अधिकारी अहिल्यानगर शहरात थांबून नंतर चौंडी येथे जातील, असे प्राथमिक नियोजन आहे. मंत्रिमंडळाची बैठक होत असल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनात धांदल उडाली आहे.

## दोन गटात हाणामारी

मारण्याची धमकी दिली.याच प्रकरणी गुड्डु राम अंकुशे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दिनेश सुनिल कासोदे , सुनिल कासोदे दोन्ही रा.दंडेवाले बाबा नगर, गौंड वस्ती यांनी लाकडी दांडक्याने रात्री आठ वाजेच्या सुमारास शिवीगाळ करत मारहाण केली. तसेच जीवे ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी मोहाडी नगर पोलीस स्टेशनला दोन्ही गटांनी परस्पर विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


|| चतुर्थ पुण्यस्मरण ||



स्व.सौ.माणिकबाई प्रकाश मोरे

जन्म दि.०१/१२/१९५५ मृत्यू दि.१८/०४/२०२१

चतुर्थ पुण्यस्मरण दिनानिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली

: शोकाकुल :


सतिष प्रकाश मोरे (मुलगा) अथर्व सतिष मोरे (नातू)

विनायक प्रकाश मोरे (मुलगा) वंदना सुहास सोनार (मुलगी)

सुहासशेठ महिपतशेठ सोनार (जावई)

धुळे, नंदुरबार, नाशिक समस्त मोरे परिवार (बेकरीवाले)

न्यु नॅशनल बेकरी, नगरपट्टी

## धुळ्यात बालरोग तज्ञ असोसिएशनचे १९-२० एप्रिलला उन्हाळी शिबीर

**धुळे, दि.१७ (प्रतिनिधी)- भारतीय बालरोग तज्ञ असोसिएशनचे राज्यस्तरीय उन्हाळी शिबीर धुळयात १९ आणि २० एप्रिलला होणार आहे. या परिषदेला सुमारे तीनशे ते चारशे बालरोग तज्ञ येतील. ही परिषद खानदेशातील बालरोग तज्ञाना दिशादर्शक ठरणार आहे. त्यामुळे परिषदेला खान्देशकॉन असे संबोधले जाणार आहे, अशी माहिती डॉ. संजय जोशी आणि डॉ.महेश अहिरराव यांनी दिली.**

बालरोग तज्ञ असोसिएशनच्या धुळयात होत असलेल्या परिषदेबाबत प्रसार माध्यमांना महिती देण्यात आली. धुळयातील आय.एम.ए सभागृहात बालरोग तज्ञ असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संजय जोशी आणि सचिव महेश अहिरराव यांनी माहिती दिली. लहान मुलांच्या आरोग्याबाबात निरनिराळे निर्णय घेतले जातात. तसेच वेगवेगळे शोधप्रबंध प्रसिध्द करून ती माहिती सर्वांपर्यत पोहचविण्यासाठी अखिल भारतीय बालरोगतज्ञ असोसिएशन काम करते. याच असोसिएशनच्या पुढाकाराने धुळयात राज्यस्तरीय परिषद १९ आणि २० एप्रिलला होणार आहे. या परिषदेला तीनशे ते चारशे बालरोग तज्ञ येतील. धुळे, नंदुरबार, जळगाव आणि नाशिक बालरोगतज्ञांसाठी ही परिषद दिशादर्शक ठरणार आहे. धुळे जिल्हयात लहान मुलांमध्ये सिकलसेल, अनिमिया आणि कुपोषण या दोन बाबी प्रामुख्याने जाणवतात. या दोन्ही आजारातुन बालकांना वाचविणे डॉक्टरांपुढे आव्हान आहे. या परिषदेतुन नवीन तंत्रज्ञान, नवी माहिती बालरोग तज्ञांना मिळेल आणि त्याचा लाभ आदिवासी क्षेत्रातील बालकांना होवु शकेल, असा आशावाद डॉ.संजय जोशी यांनी व्यनत केला.

## चोरीस गेलेले तीस स्मार्ट फोन निरनिराळ्या राज्यातून हस्तगत

**धुळे, दि.१७- शहर पोलीस स्टेशन हद्दीतून चोरीस गेलेले विविध कंपन्यांचे तीस स्मार्ट फोन हस्तगत करण्यात पोलीसांना यश आले आहे. शहर पोलीस ठाण्यातील कर्मचारी योगेश ठाकूर यांनी महाराष्ट्रासह गुजरात राजस्थान मध्यप्रदेश आसाम राज्यातून हे फोन हस्तगत केले आहे**

शहर पोलीस ठाण्यच्या हद्दीतून गेल्या काही महिन्यात विविध कंपन्यांचे तीस स्मार्ट फोन चोरीस गेले. चोरीस गेलेले फोन हस्तगत करणे पोलीसांसमोर मोठे आव्हान होते. पोलीस निरिक्षक दिपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी योगेश ठाकूर यांनी तपासाला सुरूवात केली. केंद्रीय ओळख नोंदणींचा माध्यमातून पोलीस कर्मचारी ठाकूर यांनी स्मार्ट फोनचा शोध घेण्यास सुरूवात केली. महाराष्ट्रातील अहिल्यानगर, पुणे, नाशिक, जळगाव, मालेगाव या शहरांसह राज्यस्थान, मध्यप्रदेश, आसाम, गुजरात या राज्यांमधुन हे फोन हस्तगत करण्यात यश मिळवले. सदर जप्त केलेले मोबाईल संबंधीत तक्रारदारांच्या स्वाधीन करण्यात आले. पोलीस कर्मचारी योगेश ठाकूर यांच्या कामगिरीबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक किशोर काळे, पोलीस उपाअधीक्षक राजकुमार उपासे यांनी त्यांचे कौतुक केले आहे.




उठावणा

बड़े दुख के साथ आपको सूचित किया जाता है कि किशोर काळूरामजी अग्रवाल इनके जिजाजी अकोला निवासी

श्रीमान मदनलालजी माधवलालजी अग्रवाल

रोहित दाल मीलवाले इनका दुखद निधन दि.१६-०४-२०२५ को हो गया है। उनका उठावना आज शुक्रवार दि १८-०४-२०२५ को समय दोपहर ५-०० बजे अग्रवाल विश्राम भवन, नदी किनारे, धुलिया यहापर है ।

-: शोकाकुल :-

किशोर काळूराम अग्रवाल, राहुल, रोहित, आनंद,

नंदकिशोर बाबूलाल अग्रवाल, रविंद्र मदनलाल अग्रवाल

रमाकांत वसंतलाल अग्रवाल, मनोहर रामगोपाल अग्रवाल

संदीप कमलकिशोर अग्रवाल, मनिष नरेंद्र अग्रवाल

एवं समस्त सिंगल परिवार

फर्म : मे.काळूरामजी सोनुलालजी अग्रवाल एम.के. पॅकेजिंग, धुलिया




## शहादा सर सैय्यद ऊर्दू गर्ल्स हायस्कुल येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

शहादा, दि.१७ (प्रतिनिधी)- येथील सर सैय्यद अहमद खान एजुकेशन सोसायटी संचलित, सर सैय्यद ऊर्दू प्रायमरी, ऊर्दू गर्ल्स हायस्कुल अँड ज्यूनियर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शाळेमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. प्राचार्य सैय्यद इफ्तेखार अली यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात संस्थाध्यक्ष प्रा.सैय्यद लियाकत अली आणि सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.


**गोडाऊन भाड्याने देणे**
MIDC मध्ये 600 sq.ft. चे गोडाऊन भाड्याने देणे
-: संपर्क :-
9822390888
9822388653

**पाहिजेत**
होलसेल औषधी दुकानात
१) लोकल मेडीकल स्टोअर्सवर माल पोहोचवण्यासाठी डिलीवरी बॉय, दुकानात माल काढण्यासाठी लेडीज किंवा जेन्टस्- ३
२) कॉम्प्युटर ऑपरेटर लेडीज-३
समक्ष भेटा!
युनिक कॉर्पोरेशन
बँक स्ट्रीट, सिटी युनियन बँकेच्यावरती, पहिला मजला, गल्ली नं.६, धुळे
9422296256

**पाहिजेत**
हुशार व अनुभवी
मॅनेजर - २ जागा
मार्केटींग - २ जागा
कॉम्प्युटर ऑपरेटर-२
हेल्पर - ४ जागा
-: संपर्क :-
क्रिष्णा फोम अँड फर्निशिंग
अवधान, धुळे
9820918218
9637531111

**पाहिजेत**
अग्रवाल नगर भागात घर कामासाठी बाई पाहिजे. दिवसपाळीसाठी वॉचमन पाहिजे. जोडपे असल्यास प्राधान्य. राहण्याची सोय उपलब्ध
-: संपर्क :-
9209201411

**पाहिजेत**
रेडिओलॉजी डायग्नोस्टीक सेंटरसाठी फिमेल टाईपिस्ट/ कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. समक्ष भेटा!
विमला डायग्नोस्टिक्स
जुगल वस्त्रालयासमोर, गल्ली नं.४, धुळे

**पाहिजेत**
आमच्या येथे लॉज कामासाठी (रुमबॉय) मुलगा पाहिजे.
कम्फर्ट इन लॉज
ग.नं.२, श्रीराम पेन समोर, धुळे

**कामगार पाहिजेत**
अवधान एमआयडीसी मध्ये फेब्रिकेशन कारखान्यात कामगार पाहिजेत.
-: संपर्क :-
9921053999

**प्लॉट विकणे आहे**
सर्व्हे नं. ९१, प्लॉट नं. २४ माहेश्वरी सोसायटी ८५० स्के. फुट नकाणे रोड साईबाबा मंगल कार्यालय जवळ, धुळे.
-:संपर्क :-
रमेश गंगाराम साळवे
मो. ७०६६५५९४५५, ९४२२२८८९४८

**मुले पाहिजेत**
कुंडाणे (वार) साक्रीरोड व लळींग येथील पेट्रोल पंपासाठी अनुभवी मुले पाहिजेत तसेच हवा भरण्यासाठी अनुभवी मुले पाहिजेत.
-: संपर्क :-
9822107518

**पाहिजेत**
पाण्याचे जार वाटपसाठी माणसे पाहिजेत. आकर्षक पगार मिळेल. समक्ष भेटा!
बुऱ्हानी आईस फॅक्टरी
यल्लमा देवी मंदिरासमोर, मालेगावरोड, धुळे
8208755681

**पाहिजे**
ऑफिस कामासाठी लेडीज पाहिजे. फोन करण्यासाठी स्वत: भेटा! कामाची वेळ : १० ते ६
आशुतोष सर्जिकल
गल्ली नं.५, सोन्या मारुती समोर, धुळे
9822752160

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर लावणे आहे. जनरल कामासाठी मुलगा लावणे आहे.
-: संपर्क :-
9822818015
7972768488

**पाहिजेत**
रेडिमेड शोरुमसाठी (किडस् वेअर)
सेल्सगर्ल-२
सेल्समन- १
प्रत्यक्ष भेटा!
रॉयल मेन्स वेअर अँड बबल्स किडस् अँड टॉईज
आग्रारोड, धुळे
9423916107

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर- जेन्टस्/लेडीज,
दुकानासाठी सेल्समन- जेन्टस्/लेडीज
साफसफाईसाठी- जेन्टस्/लेडीज
-: संपर्क :-
8698640400

**पाहिजेत**
* दुकान कामाकरिता अनुभवी हुशार माणूस- २
* अकौन्ट कामाकरिता लेडीज/जेन्टस्- १
-: संपर्क :-
9850815243
7588517770

**पाहिजेत**
ऑफिस करिता अनुभवी अकौन्टंट व टॅलीचे ज्ञान आवश्यक. समक्ष भेटा!
-: संपर्क :-
9823178279





हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०